।। विना सहकार नाही उद्धार ।।

# कृषि खाते सेवक सहकारी पतसंस्था मर्यादित, धुळे

## ता. जि. धुळे

रजि. नं. डीएलए/बीएनके/119 दि.12/04/1971



ऑडीट वर्ग 'अ'

५४ वा वार्षिक अहवाल सन २०२४-२५

प्रकाशक
श्री. सिद्धार्थ ईश्वर वाघ
अध्यक्ष
कृषि खाते सेवक सहकारी पतसंस्था, मर्यादित, धुळे.

# कृषी खाते सेवक सहकारी पतसंस्था मर्यादित, धुळे.

## समिती कार्यकाळ २०२३-२४ ते २०२८-२९



**श्री. सिद्धार्थ ईश्वर वाघ**
अध्यक्ष



**श्री. मुकेश भाईदास सोनवणे**
उपाध्यक्ष



**श्री. कैलास सिताराम गोपाळ**
समिती सदस्य



**श्री. प्रशांत बापुराव पाटील**
समिती सदस्य



**श्री. मनोहर चुडामण पाटील**
समिती सदस्य



**श्रीमती दिपाली भटू पाटील**
समिती सदस्या



**श्रीमती अश्विनी मधुकर चौधरी**
समिती सदस्या



**श्री. कपिल सदाशिव चौधरी**
समिती सदस्य



**श्री. अमोल हिरालाल बोरसे**
समिती सदस्य



**श्री. अमित शरदराव भामरे**
स्विकृत सदस्य



**श्री. राहुल दिलीप खेडकर**
स्विकृत सदस्य



**श्री. जगदिश अरुण पाटील**
सचिव

२८, आदर्श कॉलनी, देवपुर, धुळे. फोन नंबर. ०२५६२-२२६४३१
रजि. नं./डीएलए./बीएनके/११९ दिनांक - १२/०४/१९७१
ऑडिट वर्ग - 'अ' दिनांक - ३१/०३/२०२५
जा. नं. ७४३/२०२५-२६ दिनांक - २३/०८/२०२५

## जाहिर सुचना (नोटीस) फक्त सभासदांसाठी

सन्माननीय सदस्य बंधु भगिनी,
विनंतीपुर्वक कळविण्यात येते की, आपल्या संस्थेची वार्षिक सर्वसाधारण सभा दि. २७/०९/२०२५ रोजी शनिवारी सकाळी ठिक ९.०० वा. **कृषि सहाय्यक व पदोन्नत पतसंस्था हॉल, नकाणे रोड, देवपुर, धुळे** येथे अध्यक्ष **श्री. सिद्धार्थ ईश्वर वाघ,** यांच्या अध्यक्षतेखाली खालील विषयांवर विचार-विनिमय करण्यासाठी बोलविण्यात येत आहे. सदर सभेस अवश्य हजर राहून सहकार्य करावे.

## * विषय सुची *

म. अध्यक्ष साहेब यांचे प्रास्ताविक.
१. मागील सभेचे प्रोसिडिंग वाचून कायम करणे.
२. सन २०२४-२०२५ चा अहवाल, दि. ३१/०३/२०२५ चे तेरीज पत्रक, नफा-तोटा, ताळेबंदसह मंजूरी देणे.
३. अंदाज पत्रकापेक्षा कमी जास्त झालेल्या खर्चास मंजूरी देवून सन २०२५-२०२६ चे अंदाजपत्रकास मंजुरी देणे.
४. सन २०२४-२०२५ तपासणी अहवाल त्यावरील दोष दुरुस्ती पुर्तता अहवाल वाचुन मंजुरी देणे.
५. समितीने केलेल्या नफा वाटणीस मंजुरी देणे.
६. सन २०२५-२६ लेखापरिक्षण करणे कामी नामतालीकेतील लेखापरिक्षकाची नेमणूक करणे.
७. पोटनियम दुरुस्ती करणे.
८. सेवानिवृत्ती सभासदांचा सत्कार करणे.
९. मा. अध्यक्षांच्या परवानगीने आयत्या वेळी येणाऱ्या विषयांचा विचार विनिमय करणे.

**टीप :-**
१) सभेचे ठिकाण बदलविण्याचा अधिकार म. अध्यक्ष यांना राहिल.
२) कोरम अभावी सभा तहकुब झाल्यास सभा त्याच ठिकाणी अर्ध्या तासानंतर घेण्यात येईल.
मात्र त्या सभेस कोरमची आवश्यकता राहणार नाही.
४) वार्षिक सभेस हजर सभासदांना रु. ८००/- प्रवास खर्च देण्यात येईल.
५) अल्पोपहार ची व्यवस्था करण्यात आली आहे.

**अध्यक्ष/उपाध्यक्ष/संचालक मंडळ आदेशावरुन**
कृषि खाते सेवक सहकारी पतसंस्था मर्यादीत धुळे


## * कबुली - पत्रक *

दि. ३१/०३/२०२५ अखेर

| खाते क्रमांक | सभासदाचे नाव | शेअर रक्कम जमा | वर्गणी रक्कम जमा | येणे कर्ज रक्कम | प्रासंगीक कर्ज |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |

वरील दर्शवलेली रक्कम, शेअर, वर्गणी, कर्ज, रक्कम मान्य व बरोबर आहे.
सन्मानीय सभासद यांना विनंती. वरील कबुली पत्रक सही करुन संस्थेकडे द्यावे. ----------------------
कबुलीपत्रक न दिल्यास दर्शविलेली शेअर वर्गणी कर्ज, बरोबर आहे.
असे समजण्यात येईल. सभासदाची सही

# ॥ श्रध्दांजली ॥




भारत मातेच्या रक्षणासाठी सीमेवर,
जे भारतीय वीर जवान शहीद झाले
त्या जवानांना तसेच देशातील थोर व्यक्ती,
सामाजिक कार्यकर्ते, शास्त्रज्ञ, साहित्यिक, शेतकरी,
उद्योगभूषण, शिक्षणतज्ञ, कृषितज्ञ, व संस्थेचे सभासद
व त्यांचे नातेवाईक तसेच कृषि विभागात काम करणारे कर्मचारी
काळाच्या पडद्याआड गेले. त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली
अर्पण करीत आहोत.
ही सभा त्यांच्या दु:खात सहभागी आहे.
परमेश्वर त्यांच्या आत्म्यास चिरशांती देवो. ही प्रार्थना !

## सभासदांना विनम्र आवाहन

**१) आपली बदली झालेली असल्यास नवीन कार्यालयाचा पत्ता संस्थेस कळवावा.**

**२) आपण ज्या सभासदांना जामीनदार आहोत ते सभासद कर्ज हप्ते नियमित भरत आहे किंवा नाही याची संस्थेत दप्तर पाहुन खात्री करुन घ्यावी.**

**३) आपल्या सहकाऱ्यांना संस्थेचे सभासद होण्यास प्रवृत्त करा.**

**४) संस्थेचे कर्जफेडीसाठी कार्यालय अधिक्षक सो. यांना कर्ज हप्ता कपातीसाठी सहकार्य करा.**

**५) सभासद म्हणून सार्वजनीक कर्तव्याची जाणीव ठेवून कर्जफेड नियमित वेळेत करा.**

**६) संस्थेच्या उत्कर्षासाठी आपल्या योग्य व हितसबंधी सुचनांचा संस्था जरुर विचार करीन.**

**७) कार्यालयीन वेळ : सकाळी १०.०० ते ०१.००, सायंकाळी ४.०० ते ६.०० वाजता. शनिवार सकाळी १०.०० ते ०१.०० दुपारुन बंद. दुसरा व चौथा शनिवार सुटी (रविवार बंद)**

# मनोगत

प्रिय सन्माननिय सभासद बंधु-भगिनींनो,

स.न.वि.वि.

आपल्या संस्थेचा ५४ वा वार्षिक अहवाल आपणांपुढे सादर करतांना अत्यानंद होत आहे. या निमित्ताने आपणाशी सुसंवाद साधण्याकरिता मिळालेली ही सुसंधीच आहे.

सेवेचे अधिष्ठान त्याग आहे. त्याशिवाय सेवा शब्द व्यर्थ आहे. सेवा सहकाराचा आत्मा आहे. सहकार म्हणजे फक्त जनसामान्याचे एकत्रीकरण नव्हे किंवा एकत्रीत कार्य नव्हे, तर सामुदायीक सुखदु:खाचा विचार म्हणजे सहकार. हे तत्व जोपासण्याचा प्रयत्न समिती सदस्यांनी पतसंस्थेच्या माध्यमातून केला आहे. २०२४ ते २०२५ या आर्थिक वर्षात संचालक मंडळाने कर्जधारकांसाठी एकूण रक्कम रु. १६,००,०००/- अक्षरी सोळा लाख मात्र कर्ज मर्यादा केली आहे. शिवाय संस्थेच्या खेळत्या भांडवलातून सभासदांना वेळेवर कर्ज वाटप केले. या मुळे संस्था आर्थिक उन्नतीत आली. संचालक मंडळ व सभासदांच्या सहकार्याने हे होऊ शकले.

सहकाराच्या लहानशा अंकुराने सुरु झालेल्या पतसंस्थेची आर्थिक विकासाची प्रगती वटवृक्षासारखी झालेली आहे. या प्रगतीमागे सर्व सभासदांची संस्थेच्या कारभारा-बद्दलची जागरुकता, सहकार्य, मार्गदर्शन आणि संस्थेबद्दल असलेली आपुलकी हीच आहे.

श्री. सी. आर. पाटील प्रमाणीत लेखा परिक्षक, सहकारी संस्था, धुळे, यांचे सुयोग्य मार्गदर्शन व सहकार्य, कार्यालयीन कामकाजाचे कर्तव्यदक्ष वळण या सर्व घटकांचा मोठा वाटा आहे.

आपल्या संस्थेची कार्यपध्दती, पारदर्शकता, विनम्र सेवा व प्रगती, संगणकीकृत कार्यालय, विनम्र व तत्पर सेवा, ही आपल्या संस्थेची वैशिष्ट्ये ठरतील यात शंका नाही. आपली संस्था अधिक सक्षम करण्याकरीता व विकासाकरीता प्रत्येक सभासदाचे योगदान महत्वाचे आहे. वेळेवर आपले आर्थिक देवाण-घेवाणीचे व्यवहार पुर्ण करुन कायदेशीर कारवाई टाळावी. ही नम्र विनंती. भविष्यात अशाच प्रकारे आपले अमुल्य सहकार्य व विश्वास प्राप्त होईल ही अपेक्षा. पुन:श्च आपल्या सर्वांचे हार्दिक आभार, धन्यवाद !

जयहिंद ! जय महाराष्ट्र !

आपला सहकारी

**श्री. सिद्धार्थ ईश्वर वाघ**

अध्यक्ष

कृषि खाते सेवक सह. पतसंस्था, मर्यादीत धुळे.

# संचालक मंडळ
## समिती कार्यकाळ २०२३-२४ ते २०२८-२९

| अ. नं. | नांव | हुद्दा | पत्ता | मोबाईल नंबर |
|---|---|---|---|---|
| १ | श्री. सिद्धार्थ ईश्वर वाघ | अध्यक्ष | २८, जय मल्हार नगर, नविन नाका, साक्री रोड, धुळे | ९४०४९७००७९ |
| २ | श्री. मुकेश भाईदास सोनवणे | उपाध्यक्ष | ४१, धनदाई नगर, नाना-नानी पार्क जवळ, गोंदूर रोड, देवपूर, धुळे | ९४२३०८२७४९ |
| ३ | श्री. कैलास सिताराम गोपाळ | समिती सदस्य | १३/अ, महाविर सेक्टर-२, मांडळ शिवार, शिरपूर | ९४२३१०१४६७ |
| ४ | श्री. प्रशांत बापुराव पाटील | समिती सदस्य | मु. पो. पिंपळनेर, ता. साक्री जि. धुळे | ९४२३९४१६८९ |
| ५ | श्री. मनोहर चुडामण पाटील | समिती सदस्य | १६, जलसिंचन कॉलनी, साक्री रोड, धुळे | ९४०४६९३५१८ |
| ६ | श्रीमती दिपाली भट्टू पाटील | समिती सदस्या | ११ ब, सार्थक सोसायटी, वलवाडी, देवपूर, धुळे | ९४०४९१०६४६ |
| ७ | श्रीमती अश्विनी मधुकर पाटील | समिती सदस्या | १०१, रामचंद्र नगर, पारोळा रोड, धुळे | ७५८८३१८५२२ |
| ८ | श्री. कपिल सदाशिव चौधरी | समिती सदस्य | मु. पो. कुसुंबा, ता. जि. धुळे | ७५८८३१९८९८ |
| ९ | श्री. अमोल हिरालाल बोरसे | समिती सदस्य | मु. पो. बोरीस, ता. जि. धुळे | ९४२२०८५४७५ |
| १० | श्री. अमित शरदराव भामरे | स्वि. सदस्य | २अ, बिजली नगर, देवपूर, धुळे | ९४०३७४०७८५ |
| ११ | श्री. राहुल दिलीप खेडकर | स्वि. सदस्य | मु. बिलाडी, तह. हवेली, पो. रायखेड, ता. शहादा, जि. नंदुरबार | ८८८८२०७१८१ |

### कर्मचारी

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १ | श्री. पाटील जगदीश अरुण | सचिव | २८, टेलिफोन कॉलनी, देवपूर, धुळे | ९६८९०९२३७२ |

# ५४ वा. वार्षिक अहवाल

**सन्मानिय बंधु-भगिनिंनो,**

कृषि खाते सेवक सहकारी पतसंस्था मर्यादित धुळे च्या समितीच्या वतीने दि. ३१ मार्च २०२५ अखेर संपलेल्या सहकारी वर्षाचा ५४ वा अहवाल, ताळेबंद नफा-तोटा, तेरीज पत्रक, तसेच सन २०२५-२६ चे अंदाजपत्रक आपल्या मान्यतेस्तव सादर करतांना आनंद होत आहे.

अहवालात केलेले विवेचन, आकडेवारी यावरुन आपल्या संस्थेने या कठीण काळात केलेल्या प्रयत्नांची आपणांस कल्पना येईल. या प्रगतीमध्ये आपल्या बहुमोल सहकार्याचा सिंहाचा वाटा आहे याची आम्हाला जाणीव आहे.

**१) कार्यक्षेत्र :**

आपल्या कृषि खाते सेवक सहकारी पतसंस्था मर्यादित धुळे चे कार्यक्षेत्र नाशिक विभाग (महसूल) धुळे, नंदूरबार, जळगांव, नाशिक आहे.

**२) सभासद :**

अहवालाच्या वर्षाच्या सुरुवातीस १७४ सभासद होते. वर्षात ७३ नवीन सभासद झालेत, व वर्षात ०९ सभासद सेवानिवृती व राजीनाम्यामुळे कमी झालेले आहेत. वर्ष अखेरीस २३८ सभासद आहेत.

**कर्ज:**

**3) शेअर भांडवल :**

वर्षाच्या सुरुवातीस शेअर भांडवल रु. ८८,४७,४००/- होते. वर्षात रु. २५,८१,०००/- वाढ झाली. अहवाल वर्षात शेअर भांडवल रु. रक्कम ५,२९,७००/- परत केलेले आहे. वर्ष अखेरीस शेअर भांडवल रु. १,०८,९८,७००/- बरोबर आहे.

**४) मेंबर वर्गणी :**

अहवाल वर्षाच्या सुरुवातीस वर्गणी रु. २,२४,९७,९६०.०४ होती. वर्षात वर्गणीत वाढ रु. ५२,३४,५८३/- झाली. वर्षात वर्गणी परत रु. १६,३२,२०७.३१ वर्ष अखेर वर्गणी रु. २,६१,००,३३५.७३ बरोबर आहे.

**५) राखीव निधी :**

अहवाल वर्षाच्या सुरुवातीस राखीव निधी रु. ३०,१६,४२०.०३ होता. वर्षात प्रवेश फी वाढ ७३/-राखीव निधी ३,५८,७८०/- होऊन वर्ष अखेरीस रु. ३३,७५,२७३.०३ बरोबर आहे.

**६) इमारत निधी :**

अहवाल वर्षाच्या सुरुवातीस इमारत निधी रु. ९,६३,७८२/- होती. वर्ष अखेर रु. ९,६३,७८२/- बरोबर आहे.

**७) इमारत घसारा निधी :**

अहवाल वर्षाच्या सुरुवातीस इमारत घसारा निधी रु. ४,२३,१२९/- होता. अखेरीस इमारत घसारा निधी रु. ४,२३, १२९/- बरोबर आहे.

**८) घसारा निधी (डेड स्टॉक) :**

अहवाल वर्षाच्या सुरुवातीस रु. २,५७, २८८/- होता. अहवाल वर्ष अखेरीस रु. २,५७,२८८/- बरोबर आहे.

**९) कल्याण निधी :**

अहवाल वर्षाच्या सुरुवातीस कल्याण निधी रु. ४,३६,८६६/- आहे. वर्षात रु. ५०,०००/- कल्याण निधी देऊन वर्ष अखेरीस रु. ३,८६,८६६/- बरोबर आहे.

**१०) प्रशिक्षण निधी :**

वर्षाच्या सुरवातीस प्रशिक्षण निधी रु. ४७,०५२/- होता. वर्षे, अखेरीस ४७,०५२/- बरोबर आहे.

**११) अनामत :**

अहवाल वर्षाच्या सुरुवातीस अनामत रु. १,५६,०१६/- होती. वर्षात रु. १६/- नी वाढ होऊन वर्षात परत केलेली अनामत नाही. वर्ष अखेर अनामतसह रु. १,५६,०३२/- बरोबर आहे.

**१२) नफा :**

मागील वर्ष अखेर निव्वळ नफा दिनांक ३१/३/२०२४ रोजी नफा रु. १४,१८,७९४.५०/- होता. त्याची नफा वाटणी झालेली आहे. संस्थेस अहवाल वर्षात दिनांक ३१/३/२०२५ अखेर निव्वळ नफा रु. १७,१०,६९९.५०/- झालेला आहे.

**जिंदगी**

**१) हातात रोख रक्कम शिल्लक :**

संस्थेच्या अहवाल वर्षात आरंभी व अखेर शिल्लक नाही.

**२) धुळे बँक बचत खाते :**

अहवाल वर्षआरंभी बँक सेव्हिंग खाते रु. २९/- होती. वर्ष अखेर बँक सेव्हिंग खाते शिल्लक रक्कम रु. २९/- बरोबर आहे.

**३) बँक स्पे. रि. से. खाते :**

अहवाल वर्षा आरंभी बँक स्पे. रि. से. खाते रक्कम रु. ३९,६२७.२५/- होती. त्याच्यात वर्षात मेळालेले व्याज रु. २,५९६/- वाढ होऊन वर्ष अखेर बँक स्पे. रि. से. खाते रक्कम रु. ४२,२२३.२५ बरोबर आहे.

**४) इंदिरा सहकारी बँक लि., धुळे :**

इंदिरा सहकारी बँकेत डिपॉझिट रु. २४,७६,८६९/- बरोबर आहे. इंदिरा सहकारी बँकेत बचत खाते रु. ७,५९,५८२/- बरोबर आहेत.

या बाबत जळगांव सहकारी न्यायालयात दि. २/२/२००७ रोजी दावा दाखल केला होता. न्यायालयाने इंदिरा सहकारी बँक लि. धुळे दि. २/९/२००८ रोजी न्यायालयीन आदेशाने दि. ३०/९/२००८ रोजी नगर भू मापन अधिकारी धुळे, यांनी मुख्य विभाग ग. नं. ४ घ. नं. १३५ सि. स. नं. २८८५ वर अॅटॅच बोजा आहे. व सहकार न्यायालय जळगांव यांनी केस. नं. डी. १९ / २००७ निकाल दिनांक २१/९/२०१३ रोजी संस्थेच्या लाभात दिला असून, मा. सहकार सा ो. यांनी महाराष्ट्र राज्य सहकारी अपील न्यायालय मुंबई खंडपीठ औरंगाबाद, येथे अपील केले होते. त्या अपीलेट कोर्ट केस नं. ४० / २०१४ प्रमाणे दिनांक ३०/११/१६ न्याय निर्णयानुसार उपरोक्त प्रतिवादी १ (इंदिरा सहकारी बँक, अवसायक) यांचे कडून रक्कम २८,७३,८५७/- दि. ०२/०२/२००७ पासून ते प्रतिवादी क्र. १ बँक अवसायनात गेल्या पर्यन्त १२% या व्याज दराने वसुल करावे, असे प्रमाण पत्र संस्थेस महाराष्ट्र सहकारी कायद्याचे कलम ९८ नुसार वसुली प्रमाण पत्र जा. क्र. ४५/ २०१७ दिले आहे व अपील न्यायालय मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांचे आदेशाने बँकेचे अवसायक यांना आदेशीत करण्यात येते की, ठेव विमा योजनेच्या तरतुदी व पतहमी अधिनीयम १९६१ चे कायद्यानुसार आणि महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनीयम १९६० कायद्यानुसार प्रतिवादी बँकेचे म. अवसायक सा ो. यांनी संस्थेस रक्कम रु. २८,७३,८५७/- द्यावी. त्या अनुषंगाने संस्थेने मे. सिव्हिल कोर्ट धुळे स्पे. द. न. २३ / २०१५ दि. ११/०९/२०१५ रोजी दावा दाखल आहे.

**५) स्टेट बँक प्रमोद नगर शाखा :**

दि. ३१/३/२०२४ अखेर सेव्हिंग खाते १३,९९,८७३.६७ होती. वर्षात वाढ २,११,१९,९४५/- एकुण रु. २,२५,१९,८१८.६७ झाली. वर्षात काढलेली रक्कम २,२३,५२,२००.६६ जाता वर्ष अखेर १,६७,६१८.०१ बरोबर आहे.

**६) गुंतविलेल्या रकमा :**

१) टेलिफोन डिपॉझिट - संस्थेने फोन घेतला त्यावेळी डिपॉझिट रु. १,४४०/- लेखाधिकारी भारत संचार निगम लि. धुळे कडे आहे.

२) धुळे जिल्हा मध्यवर्ती सह. बँक लि., धुळे शेअर रु. ३०,०५०/- बरोबर आहे.

३) धुळे जिल्हा सह. पगारदार फेड. लि. शेअर रु. १,०००/- रक्कम होती. त्यात वाढ नाही १,०००/- शेअर बरोबर आहे.

**७) मेंबर कर्ज :**

अहवाल वर्षआरंभी सभासदांकडे जामिनकी कर्ज रक्कम रु. ३,२७,७०,१९७/- होते. अहवाल वर्षात सभासदांना जामीनकी दिलेले कर्ज रु. २,२०,४३,३८३/- व प्रासंगिक दिलेले कर्ज रु. ७,००,०००/- आहे. वर्षात सभासदांकडून आलेला वसूल कर्ज रु. १,४६,१५,५२४/- व प्रासंगिक कर्ज वसुल रु. ५,२३,८७८/- आहे. अहवाल वर्ष अखेर कर्ज रु. ४,०३,७४,१७८/- बरोबर आहे.

**८) कायम मालमत्ता :**

ऑफिस इमारत ९,७६,२९४/- होती. इमारत रु. ९,७६, २९४/- बरोबर आहे. अहवाल वर्षाआरंभी डेडस्टॉक रु. ४५,८७०/- होता. त्या मध्ये रु. ९,५,००/- वाढ झाली. आणि त्यात डेडस्टॉक घसारा रु.४,५७२/- वजा जाता डेडस्टॉक रु. ५०,७९८/- बरोबर आहे. एकुण कायम मालमत्ता रु. १०,२७,०९२/- बरोबर आहे. रु.४,५७२/- वजा जाता डेडस्टॉक रु. ५०,७९८/- बरोबर आहे. एकुण कायम मालमत्ता रु.१०,२७,०९२/- बरोबर आहे.

**९) समितीचे कामकाज :**

अहवाल वर्षात समितीच्या १२ सभा झालेल्या आहेत. समितीचे कामकाज खेळीमेळीच्या वातावरणात पार पडले असून सर्व निर्णय एकमताने घेण्यात आलेले आहेत.

**१०) संस्थेची तपासणी :**

मा. श्री. सी. आर. पाटील, प्रमाणित लेखा परिक्षक सहकारी संस्था, धुळे, यांनी सन २०२४-२५ ची तपासणी वेळेवर पूर्ण करुन संस्थेस 'अ' वर्ग दिलेला आहे. शकाची दुरुस्ती पुर्तता अहवाल जा. नं. ७४४ / २०२५ - २६ दि. २५/०८/२०२५ रोजी पाठविला आहे. तसेच तपासणी काळात त्यांनी बहुमोल सूचना केल्यात त्याबद्दल संस्था
त्यांची आभारी आहे.

**११) आभार प्रदर्शन :**

गेल्या वर्ष भरात आपल्या सर्वांच्या सहकार्यामुळे संस्थेचे कामकाज चालविण्यास मला आपल्या समितीच्या सदस्यांची व आपली जी बहुमोल मदत झाली त्याबद्दल मी आपणा सर्वांचा आभारी आहे.

तसेच ही जबाबदारी पार पाडण्यात संस्थेच्या सेवक वर्गाचा फार मोठा वाटा आहे. याचा मी गौरवपूर्वक उल्लेख करतो. विशेषतः सचिव श्री. पाटील जगदिश अरुण यांचे संस्थेच्या कामकाजात बहुमोल मार्गदर्शन लाभले आहे. या संस्थेस आपले सदैव सहकार्य राहील, असा मला विश्वास आहे.

संस्थेने या वर्षी देखील सर्व २३८ सभासदांचा प्रत्येकी रु. १५,००,०००/- चा विमा घेतलेला आहे. आपले सहकार्य हीच आमची योग्य सेवा. पुन्हा एकदा आपल्या सर्वांचे आभार मानून हा अहवाल पूर्ण करतो. जयहिंद ! जय महाराष्ट्र

आपला सहकारी

**श्री. सिद्धार्थ ईश्वर वाघ**

अध्यक्ष

कृषि खाते सेवक सह. पतसंस्था, मर्यादीत धुळे.

# तेरीज पत्रक

## दि. ०१/०४/२०२४ ते दि. ३१/०३/२०२५ अखेर

| अ. नं. | दि. १/४/२०२३ ते ३१/३/२०२४ | | जमा | दि. १/४/२०२४ ते ३१/३/२०२५ | | दि. १/४/२०२३ ते ३१/३/२०२४ | | खर्च | दि. १/४/२०२४ ते ३१/३/२०२५ | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | रुपये | पैसे | | रुपये | पैसे | रुपये | पैसे | | रुपये | पैसे |
| | -- | | आरंभी शिल्लक | -- | | -- | | अखेर शिल्लक | -- | |
| १ | -- | | धुळे बँक सेव्हि. खाते | -- | | -- | | धुळे जि.म.से.बँक | -- | |
| २ | -- | | मागील नफा | -- | | २,४३६ | | धुळे जि.म.रि.से.बँक | २,५९६ | |
| ३ | १,९०,६४,८८९ | ९६ | स्टेट बँक सेव्हिं. खाते | २,२३,५२,२०० | ६६ | १,९३,६३,७८३ | | स्टेट बँक से. खाते | २,११,१९,९४५ | |
| ४ | ४०,००,००० | | स्टेट बँक डिपॉ. खाते | -- | | २८,३९० | | छपाई स्टेशनरी | ३,३५० | |
| ५ | २,४३७ | | धुळे बँक से.रि. व्याज | २,५९६ | | २२,९४१ | | तपासणी फी | २५,२५० | |
| ६ | ७,६२८ | | स्टेट बँक सेव्हिं. व्याज | ३५,३६४ | | १,४२३ | | तार फोन, टपाल | १,४९१ | |
| ७ | ६,१७,११२ | | स्टेट बँक डिपॉ. व्याज | -- | | ७५,६६५ | | जनरल मिर्टींग खर्च | १,११,२५० | |
| ८ | २२,३७,९६६ | | मे. व्याज वसुल | ३१,२०,२८० | | १०,०३,४१८ | | मेंबर वर्गणी व्याज | ११,२४,८९८ | |
| ९ | १७,२२,२५० | | मे. शेअर वसुल | २५,८१,००० | | ४,७०,८०० | | मेंबर शेअर परत | ५,२९,७०० | |
| १० | ४२,३५,३७० | | मे. वर्गणी वसुल | ५२,३४,५८३ | | १८,०५,७७२ | ४६ | मेंबर वर्गणी परत | १६,३२,२०७ | ३१ |
| ११ | १,३२,६५,६९७ | | मे कर्ज वसुल | १,४६,१५,५२४ | | २,१२,५९,६२० | | मेंबर कर्ज दिलेले | २,२०,४३,३८३ | |
| १२ | १९ | | मे प्रवेश फी | ७३ | | ८,७७,५५२ | ३५ | मागील नफा | १६,८७,७४८ | ७० |
| १३ | २८५ | | मेंबर इतर | १,०९५ | | १९ | | प्रवेश फी | ७३ | |
| १४ | ७ | | मेंबर अनामत | १६ | | १,६८,६७५ | | मेंबर विमा | १,७३,७८२ | १६ |
| १५ | १,६८,६७५ | | मेंबर विमा | १,७३,७८२ | १६ | ५,३१,७१६ | | लाभांश | ७,०७,७९२ | |
| १६ | ५,३१,७१६ | | लाभांश | ७,०७,७९२ | | -- | | भेट वस्तू | २,६१,००० | |
| १७ | -- | | भेट वस्तू | २,६१,००० | | ३४,००० | | बोनस | ३४,००० | |
| १८ | ३४,००० | | बोनस | ३४,००० | | २०,००० | | इमारत झिज | -- | |
| १९ | २०,००० | | इमारत घसारा निधी | -- | | २०,००० | | डेडस्टॉक झिज | -- | |
| २० | २०,००० | | डेडस्टॉक घसारा निधी | -- | | ९,५४० | | इलेक्ट्रीक बिल | ७,९०० | |
| २१ | १५,००० | | प्रशिक्षण निधी | -- | | ९,४४० | | प्रशिक्षण / डेडस्टॉक | ९,५०० | |
| २२ | -- | | टॅक्स | १८,५४० | | २,९५६ | | महानगरपालिका | -- | |
| २३ | ५४,००० | | घरभाडे | ५९,००० | | २,२८० | | प्रवास खाते | ३,४४० | |
| २४ | ५३,७४१ | | प्रा. फंड वर्गणी | ५९,२०३ | | ५५,२०५ | | टॅक्स / कल्याणनिधी | ५०,००० | |
| २५ | ७६,७१९ | | प्रासंगिक कर्ज | ५,२३,८७८ | | २६५ | ५० | बँक चार्जेस | २६५ | ५० |
| २६ | ११,५३१ | | प्रासंगिक कर्ज व्याज | ३२,३७० | | २,१३,००० | | पगार खाते | २,१२,५०० | |
| २७ | २,१९,४०७ | | राखीव निधी | ३,५८,८५३ | | ४,३५५ | | किरकोळ खाते | ९,९०० | |
| २८ | ५,०८० | | डेडस्टॉक | ४,५७२ | | २०,४०० | | संस्था प्रा. फंड वर्गणी | २१,२५० | |
| २९ | १६,३२८ | ३५ | शिल्लक नफा | २,५२,६२५ | ८५ | १२,९४१ | | प्रा. फंड व्याज | १६,७०३ | |
| ३० | ३३,०९२ | | ता.कृ.अ.देणे | ३,७४,२१० | | -- | | कॉम्प्युटर ऑपरेटर | ९,५०० | |
| ३१ | ६१,१२० | | उत्तम जिंदगी येणे | ८१,९२५ | | -- | | कोर्ट खर्च | १०,४०० | |
| ३२ | -- | | निवडणूक मानधन | ३५,१४० | | २,८५० | | कॉम्प्युटर खर्च | ५०० | |
| ३३ | | | | | | -- | | वेबसाईट खर्च | १९,२३४ | |
| ३४ | | | | | | ११,४५४ | | वसुली मेहनताना | ११,२८२ | |
| ३५ | | | | | | ५,०८० | | डेडस्टॉक राईटअप | ४,५७२ | |
| ३६ | | | | | | ४,०५,००० | | प्रासंगिक कर्ज | ७,००,००० | |
| ३७ | | | | | | ३३,०९२ | | ता.कृ.अ.देणे दिले | ३,७४,२१० | |
| | ४,६४,७४,०६९ | ३१ | एकुण | ५,०९,१९,६२२ | ६७ | ४,६४,७४,०६९ | ३१ | एकुण | ५,०९,१९,६२२ | ६७ |

श्री. पाटील जगदिश अरुण
सचिव

श्री. सिद्धार्थ ईश्वर वाघ
अध्यक्ष

# कृषी खाते सेवक सहकारी पतसंस्था मर्यादित धुळे

## नफा - तोटा पत्रक - दि. ०१/०४/२०२४ ते दि. ३१/०३/२०२५

| ३१/०३/२०२४ रक्कम | | खर्च | ३१/०३/२०२५ रक्कम | | | | ३१/०३/२०२४ रक्कम | | उत्पन्न | ३१/०३/२०२५ रक्कम | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| रु. | पै. | | रु. | पै. | रु. | पै. | रु. | पै. | | रु. | पै. | रु. | पै. |
| | | दिलेले व्याज | | | ११,२४,८९८ | | -- | | मिळालेले व्याज | | | ३१,९०,६१० | |
| १०,०३,४१८ | | मेंबर वर्गणी व्याज | ११,२४,८९८ | | | | २२,३७,९६६ | | मेंबर व्याज | ३१,२०,२८० | | | |
| | | | | | | | ११,५३१ | | प्रासंगिक कर्ज व्याज | ३२,३७० | | | |
| | | | | | | | -- | | धुळे बँक से. व्याज | -- | | | |
| | | | | | | | २,४३६ | | धुळे बँकरी से. व्याज | २,५९६ | | | |
| | | | | | | | ७,६२८ | | स्टेट बँक से. व्याज | ३५,३६४ | | | |
| | | | | | | | ६,१७,११२ | | स्टेटबँक डिपॉ.व्याज | -- | | | |
| | | | | | | | २८,७६,६७३ | | एकुण | ३१,९०,६१० | | | |
| २,१३,००० | | कर्मचारी पगारखाते | २,१२,५०० | | २,१२,५०० | | | | किरकोळ उत्पन्न | | | १,१३,७७५ | |
| | | पगार खाते | | | | | २८५ | | मेंबर इतर | १,०९५ | | | |
| | | | | | | | ५४,००० | | घरभाडे | ५९,००० | | | |
| | | | | | | | -- | | टॅक्स | १८,५४० | | | |
| | | | | | | | -- | | निवडणूक मानधन | ३५,१४० | | | |
| | | | | | | | ५४,२८५ | | एकुण | १,१३,७७५ | | | |
| १,४२३ | | तार. फोन टपाल | | | १,४९१ | | | | | | | | |
| | | तार. फोन टपाल | १,४९१ | | | | | | | | | | |
| २८,३९० | | छपाई स्टेश. खाते | | | ३,३५० | | | | | | | | |
| | | स्टेशनरी खाते | ३,३५० | | | | | | | | | | |
| २२,९४१ | | हिशोब तपासणी | | | २५,२५० | | | | | | | | |
| | | हिशोब तपासणी | २५,२५० | | | | | | | | | | |
| | | सर्वसाधारण खर्च | | | २,२६,१९६ | ५० | | | | | | | |
| ४,३५५ | | किरकोळ खर्च | ९,९०० | | | | | | | | | | |
| २६५ | ५० | बँक चार्जेस | २६५ | ५० | | | | | | | | | |
| ७५,६६५ | | जनरल मिटींग | १,११,२५० | | | | | | | | | | |
| ९,५४० | | इले. बिल | ७,९०० | | | | | | | | | | |
| २,८५० | | संगणक दुरू. खाते | ५०० | | | | | | | | | | |
| २,२८० | | प्रवास खर्च | ३,४४० | | | | | | | | | | |
| २,९५६ | | महानगरपालिका | -- | | | | | | | | | | |
| ५,०८० | | डेडस्टॉक राईटअप | ४,५७२ | | | | | | | | | | |
| -- | | कोर्ट खर्च | १०,४०० | | | | | | | | | | |
| ११,४५४ | | वसुली मेहनताना | ११,२८२ | | | | | | | | | | |
| ५५,२०५ | | टॅक्स | -- | | | | | | | | | | |
| -- | | कॉम्प्युटर ऑपरेटर | ९,५०० | | | | | | | | | | |
| २०,४०० | | संस्था प्रा. फंडवर्गणी | २१,२५० | | | | | | | | | | |
| १२,९४१ | | प्रा. फंड व्याज | १६,७०३ | | | | | | | | | | |
| -- | | वेबसाईट खर्च | १९,२३४ | | | | | | | | | | |
| २,०२,९९१ | ५० | एकुण | २२६१९६ | ५० | | | | | | | | | |
| | | कायम मालमत्ता | | | -- | | | | | | | | |
| २०,००० | | डेडस्टॉक घसा. झिज | -- | | | | | | | | | | |
| २०,००० | | इमारत झिज | -- | | | | | | | | | | |
| ४०,००० | | एकुण | -- | | | | | | | | | | |
| | | नफा | | | १७,१०,६९९ | ५० | | | | | | | |
| १४,१८,७९४ | ५० | ३१/०३/२०२४ | | | | | | | | | | | |
| | | ३१/०३/२०२५ | १७,१०,६९९ | ५० | | | | | | | | | |
| २२,६७,४३६ | ०० | एकुण | | | ३३,०४,३८५ | ०० | २२,६७,४३६ | ०० | एकुण | | ०० | ३३,०४,३८५ | ०० |

**श्री. पाटील जगदिश अरुण** (सचिव) **श्री. सिद्धार्थ ईश्वर वाघ** (अध्यक्ष)

# ताळेबंद पत्रक.

## दि. ०१/०४/२०२४ ते दि. ३१/०३/२०२५

| ३१/०३/२०२४ रक्कम रुपये पैसे | कर्ज | ३१/०३/२०२५ रक्कम रुपये पैसे | रुपये पैसे | ३१/०३/२०२४ रक्कम | जिंदगी | ३१/०३/२०२५ रक्कम रुपये पैसे | रुपये पैसे |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ कोटी | अधि. | १ कोटी | | -- | रोख रक्कम | -- | -- |
| ८८,४७,४००.०० | भागभांडवल | | १,०८,९८,७००.०० | | | | |
| | शेअर भांडवल | १,०८,९८,७००.०० | | | | | |
| | शेअर | | | | | | |
| २,२४,९७,९६०.०४ | वर्गणी | | २,६१,००,३३५.७३ | -- | बँक शिल्लक | -- | ३४,४६,३२१.२६ |
| | मेंबर वर्गणी | २,६१,००,३३५.७३ | | २९.०० | धुळे बँक से. खाते | २९.०० | |
| | | | | ३९,६२७.२५ | धुळे बँक रि.से खाते | ४२,२२३.२५ | |
| | | | | ७,५९,५८२.०० | इंदिरा बँकसे. खाते | ७,५९,५८२.०० | |
| | | | | २४,७६,८६९.०० | इंदिरा बँक डिपॉ. | २४,७६,८६९.०० | |
| | | | | १३,९९,८७३.६७ | स्टेट बँक से. खाते | १,६७,६१८.०१ | |
| | | | | ४६,७५,९८०.९२ | एकुण | ३४,४६,३२१.२६ | |
| | निधी | | ५४,५३,३९०.०३ | -- | गुंतवलेल्या रकमा | -- | ३२,४९०.०० |
| ३०,१६,४२०.०३ | राखीव निधी | ३३,७५,२७३.०३ | | १,४४०.०० | टेलीफोन | १,४४०.०० | |
| ९,६३,७८२.०० | इमारत निधी | ९,६३,७८२.०० | | ३०,०५०.०० | धुळे बँक शेअर | ३०,०५०.०० | |
| ४,२३,१२९.०० | इमारत घ. निधी | ४,२३,१२९.०० | | १,०००.०० | धुळेपगार फेडरेशन | १,०००.०० | |
| २,५७,२८८.०० | डेडस्टॉक घ. निधी | २,५७,२८८.०० | | -- | स्टेट बँक डिपॉझिट | -- | |
| ४,३६,८६६.०० | कल्याण निधी | ३,८६,८६६.०० | | ३२,४९०.०० | एकुण | ३२,४९०.०० | |
| ४७,०५२.०० | प्रशिक्षण निधी | ४७,०५२.०० | | | | | |
| ५१,४४,५३७.०३ | एकुण | ५४,५३,३९०.०३ | | | | | |
| १,५६,०१६.०० | अनामत | | १,५६,०३२.०० | | मेंबर येणे कर्ज | | ४,०३,७४,१७८.०० |
| | अनामत | १,५६,०३२.०० | | ३,२४,४१,९१६.०० | मेंबर कर्ज | ३,९८,६९,७७५.० | |
| | | | | ३,२८,२८१.०० | प्रासंगिक कर्ज | ५,०४,४०३.०० | |
| | | | | ३,२७,७०,१९७.०० | एकुण | ४,०३,७४,१७८.० | |
| २,९८,६७६.०० | प्रा. फंड वर्गणी | | | -- | | | |
| | प्रा. फंड वर्गणी | ३,५७,८७९.०० | ३,५७,८७९.०० | | | | |
| ६०,०००.०० | बोनस देणे | ६०,०००.०० | ६०,०००.०० | | | | |
| ६१,१२०.०० | उत्तम जिंदगी | १,४३,०४५.०० | १,४३,०४५.०० | | | | |
| | तरतूद | | | | | | |
| १६,३२८.३५ | नफा मागील | | | -- | कायम मालमत्ता | -- | १०,२७,०९२.०० |
| | नफा | | | ९,७६,२९४.०० | डेडस्टॉक | ९,७६,२९४.०० | |
| १४,१८,७९४.५० | दि.३१/०३/२०२४ | | | ४५,८७०.०० | ऑफीस इमारत | ५०,७९८.०० | |
| | दि.३१/०३/२०२५ | १७,१०,६९९.५० | १७,१०,६९९.५० | १०,२२,१६४.०० | एकुण | १०,२७,०९२.०० | |
| | | | | | | | |
| ३,८५,००,८३१.९२ | एकुण | | ४,४६,६०,०८१.२६ | ३,८५,००,८३१.९२ | एकुण | | ४,४६,६०,०८१.२६ |

श्री. पाटील जगदिश अरुण
सचिव

श्री. सिद्धार्थ ईश्वर वाघ
अध्यक्ष

# अंदाज-पत्रक २०२५ ते २०२६

| अ. नं. | खर्च तपशील | सन २०२४-२५ | प्रत्यक्ष | कमी | जास्त | सन २०२५-२६ | अ. नं. | उत्पन्न तपशील | सन २०२४-२५ | प्रत्यक्ष | कमी | जास्त | सन २०२५-२६ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | मेंबर वर्गणी व्याज | १३००००० | ११२४८९८.०० | १७५१०२.०० | — | १३००००० | १ | मेंबर व्याज वसुल | २५००००० | ३१५२६५० | — | ६५२६५० | ४०००००० |
| २ | नोकर पगार खाते | ३५०००० | २१२५००.०० | १३७५००.०० | — | ३५०००० | २ | बँक डिपॉ.से.व्याज | ३००००० | ३७९६० | २६२०४० | — | २००००० |
| ३ | नफा तोटा खाते | ६०००० | ३७९५३.०० | २२०४७.०० | — | ६०००० | ३ | मेंबर इतर | ५००० | १०९५ | ३९०५ | — | ५००० |
| ४ | तारफोन टपाल | २०००० | १४९१.०० | १८५०९.०० | — | २०००० | ४ | घरभाडे | ६५००० | ५९००० | ६००० | — | ७०००० |
| ५ | छपाई स्टेशनरी | ३५००० | ३३५०.०० | ३१६५०.०० | — | ३५००० | ५ | शिल्लक नफा | ३०००० | — | — | — | — |
| ६ | तपासणी फी | ३५००० | २५२५०.०० | ९७५०.०० | — | ३५००० | ६ | मेंबर प्रवेश फी | — | ७३ | — | ७३ | १००० |
| ७ | किरकोळ खर्च | १५००० | ९९००.०० | ५१००.०० | — | १५००० | ७ | टॅक्स, रिफंड | — | १८५४० | — | १८५४० | — |
| ८ | बँक कमिशन | ५००० | २६५.५० | ४७३४.५० | — | ३००० | ८ | निवडणूक मानधन | — | ३५१४० | — | ३५१४० | — |
| ९ | जनरल मिटींग | १२०००० | १११२५०.०० | ८७५०.०० | — | १७०००० | ९ | | | | | | |
| १० | इले. बिल | १५००० | ७९००.०० | ७१००.०० | — | १५००० | १० | | | | | | |
| ११ | वकील फी/प्रवास | ५०००० | १३८४०.०० | ३६१६०.०० | — | ५०००० | ११ | | | | | | |
| १२ | महानगरपालिका | ७००० | — | — | — | १०००० | १२ | | | | | | |
| १३ | प्रशिक्षण/ घसारा झिज | ३०००० | — | — | — | ३०००० | १३ | | | | | | |
| १४ | बोनस/ इमारत झिज | ३०००० | — | — | — | ५०००० | १४ | | | | | | |
| १५ | ३१/३/२५ नफा | १४००००० | १७१०६९९.५० | | ३१०६९९.५० | — | १५ | | | | | | |
| १६ | ३१/३/२६ नफा | — | — | — | — | १९००००० | १६ | | | | | | |
| | एकूण | ३४७२००० | ३२५९२९७.०० | ४५६४०२.५० | ३१०६९९.५० | ४०४३००० | | एकूण | २९१५००० | ३३०४४५८ | २७१९४५ | ७०६४०३ | ४२७६००० |

| श्री. एस.आय. वाघ | श्री. एम.बी. सोनवणे | श्री. के.एस. गोपाळ | श्री. पी.बी. पाटील | श्री. एम.सी. पाटील | श्रीमती डी.बी. पाटील | श्रीमती ओ.एम. चौधरी | श्री. के.एस. चौधरी | श्री. ए.एच. बोरसे | श्री. ए.एस. भामरे | श्री. आर.डी. खेडकर | श्री. जे.ओ. पाटील |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| अध्यक्ष | उपाध्यक्ष | संचालक | संचालक | संचालक | संचालिका | संचालिका | संचालक | संचालक | स्विकृत संचालक | स्विकृत संचालक | सचिव |

# कृषी खाते सेवक सहकारी पतसंस्था मर्यादित धुळे

## संस्था प्रगती बाबत माहिती सन १/४/२०१५-१६ ते ३१/३/२०२५ अखेर

| अ. नं. | नाव | सन १५-१६ | सन १६-१७ | सन १७-१८ | सन १८-१९ | सन १९-२० | सन २०-२१ | सन २१-२२ | सन २२-२३ | सन २३-२४ | सन २४-२५ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | ऑडिट वर्ग | अ | अ | अ | अ | अ | अ | अ | अ | अ | अ |
| २ | मेंबर्स | १५४ | १५४ | १५० | १४६ | १४६ | १३७ | १५४ | १६४ | १७४ | २३८ |
| ३ | मेंबर्स शेअर्स | ५२४७७९० | ६००११९० | ६६६१४३० | ७०६६६२० | ७७४८६५० | ७०६४८५० | ७०८४६५० | ७५९५९५०,०० | ८८४७४००,०० | १०८९८७००,०० |
| ४ | मेंबर वर्गणी | १३७८२८७१ | १५४४७५५१ | १५९०२६११ | १७२१६८९५ | १८९०९३४० | १८९०६२७३.५० | १९१६९६५३.२५ | २००६८३६२.५० | २२४९७९६०.०४ | २६१००३३५.७३ |
| ५ | राखीव निधी | ६४४२०१ | ९१७६२० | ११९४३२४ | १४८४८५३ | १८८५७७ | २२५९४९०.३ | २५५५७४३.०३ | २७९७०१३.०३ | ३०१६४२०.०३ | ३३७५२७३.०३ |
| ६ | इमारत निधी | १०६४३८२ | १०६४३८२ | ९४३७८२ | ९४३७८२ | ९४३७८२ | ९४३७८२ | ९४३७८२ | ९४३७८२.०० | ९६३७८२.०० | ९६३७८२.०० |
| ७ | मेंबर अनामत | ११७७१८ | १६७४८८ | ३०३१२९ | १४०५६२ | १४०५६२ | १५१९९१ | १४४००१ | १५६००९.०० | १५६०१६.०० | १५६०३२.०० |
| ८ | कल्याण निधी | ४७६८६६ | ४७६८६६ | १३०८१७३ | १६०३६६१ | ४५६८६६ | ४३६८६६ | ४३६८६६ | ४३६८६६.०० | ४३६८६६.०० | ३८६८६६.०० |
| ९ | नफा | १०९३६२१ | १०८४२४० | १६०३ | १०७३ | १४४४२२६ | १०६१७५७.५० | ९५७८०५.५० | ८७७५५२.१० | १४१८७९४.५० | १७१०६९९.५० |
| १० | धुळे बँ.से. खाते | २०३४ | १८८४ | १८८४ | १६०३ | ८७४ | ५४४ | २०३ | २९.०० | २९.०० | २९.०० |
| ११ | बँक शेअर्स | ३००५० | ३००५० | ३००५० | ३००५० | ३००५० | ३००५० | ३००५० | ३००५०,०० | ३००५०,०० | ३००५०,०० |
| १२ | मेंबर कर्ज | १८११९९८६ | १९०५७५१८ | २२४००४७५ | २३१०२२११ | २५३८९१२९१ | २२२४४२८४ | २५४७३०४७ | २४४४७९९३.०० | ३२७७०१९७.०० | ४०३७४१७८.०० |
| १३ | डेडस्टॉक | १०४३८८ | ६८८०० | ८४१०० | ७५६०० | ६७४०० | ५९३०० | ५७३०१ | ५०९५०,०० | ४५८७०.०० | ५०७९८.०० |
| १४ | मे / बँक व्याज | २११७१४० | २४११८८७ | २६१३०८७ | ३०२५२२१ | २८१८००८ | २४७१२३७ | २४३३६०६ | २२३११०६.०० | २८७६६७३.०० | ३११०६१०.०० |
| १५ | नफा-तोटा प. | १८३०६ | ४४८४२ | -- | -- | १३६४७ | १६८८२ | १९७६६ | २६६९७.०० | ३३३४१.०० | ३७९५३.०० |
| १६ | स्टेशनरी छपाई | ११३३१ | ६९३६ | ७१४२ | ५६३७ | ३०१४ | ८८२५ | ३९५० | ६८७०,०० | २८३९०.०० | ३३५०,०० |
| १७ | पगार खाते | २२०८०० | २५६८०० | २६१४०० | २८६९०० | १९७२०० | १२९००० | १५१५०० | १७६५००,०० | २१३०००,०० | २१२५००,०० |
| १८ | किरकोळ खाते | ११६८७ | २२५५४ | १५८२६ | १२२१० | १४०१० | १११७२ | २८६८ | ३८४१.०० | ४३५५.०० | ९९००,०० |
| १९ | भेट वस्तू | ४५७६५० | ६४१७५० | ७८८०४० | -- | १९४१४७ | १८६१२० | १३८००० | १२४०००,०० | -- | २६१०००,०० |
| २० | मे. वर्गणी व्याज | ६८७६५९ | ७७३५१५ | ८७०७५५ | ९४७९८९ | १०३३०१३ | ११३४५५९ | ११३४७३६ | ९५८४८३.०० | १००३४१८.०० | ११२४८९८.०० |
| २१ | लाभांश | ४७८९८६ | ७३४६९० | ७२०१४६ | ९३६८१४ | ८४७९९४ | ७७४८६५ | ७१८५७५ | ५६६७७२.०० | ५३१७१६.०० | ७०७७९२.०० |
| २२ | खेळते भांडवल | २२८९९९८८ | २५६६८३३५ | २७२२०१४२ | २९५९४८०० | ३२४१४०.७८ | ३१७८७९१०.२८ | ३२२१७९७५.७८ | ३२२१७९७५.७८ | ३८५००८३१.९२ | ४४८८००८१.२६ |

श्री. पाटील जगदिश अरुण
सचिव

श्री. सिद्धार्थ ईश्वर वाघ
अध्यक्ष

# ॥ चिंतन ॥

संस्था कोणतीही असो
सरकारी, सहकारी, खाजगी वा धर्मार्थ
संस्थेत ठराविक तास काम करणे
हा झाला कायदा
पण कामात स्वतःला झोकून देणे
ही झाली नैतिकता
मी पगार घेतो म्हणून काम करतो
हा झाला व्यवहार
संस्थेच्या अस्तित्वाची सुरक्षिततेची, प्रतिष्ठेची
योग्य काळजी घेण्याचे कार्य
मला पार पाडावयाचे आहे.
ही झाली आपुलकी
संस्थेची प्रगती आहे तोवरच
माझे अस्तित्व कायम आहे, माझी प्रतिष्ठा आहे
म्हणून संस्थेला हानीकारक ठरेल
अशी कृती मी कधीही करणार नाही.
पण सामाजिक ऋण फेडण्याच्या भावनेने
स्वतःला कामात वाहून घेईन,
ही प्रत्येकाची भावना असली पाहिजे,
यातच संस्थेचा विकास
व स्वतःचा उद्धार आहे.

मुद्रक : रितिका ग्राफिक्स, सत्यसाई बाबा सोसा, साक्री रोड, धुळे

**पुस्त-डाक**

प्रति,
श्री.रा.रा. ______________________

______________________

मु. पो. ______________________

ता. __________ जि. __________

**जा. क्र. 743 / 2025 - 26 दि. 23/08/2025**

प्रेषक

**अध्यक्ष**

कृषि खाते सेवक सेवक सहकारी पतसंस्था मर्यादीत, ता. जि. धुळे
२८, आदर्श कॉलनी, देवपूर, धुळे २२६४३१